कृषी विभाग, महाराष्ट्र शासन
संचालक (कृषी अभियांत्रिकी संचालनालय) कृषी आयुक्तालय,पुणे.
फोन नं : ०२०-२६१२२१४३, ई मेल : ddainputs५@gmail.com

जा.क्र/कृषी यांत्रिकीकरण /गुनि-५/र-८४४/२०२६ दिनांक: ०५ -११-२०२६

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व

विषय:- कृषि यांत्रिकीकरण सर्व योजनेतर्गत सन २०२५-२६ व २०२६-२७ मधील लाभार्थ्यांना पुर्वसंमती प्रदान करणेबाबत....

संदर्भ: मा. सचिव (कृषि) यांच्या दि.२९.१०.२०२६ रोजीच्या ऑनलाईन बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार.

उपरोक्त विषयान्वये राज्यात केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण, राष्ट्रीय कृषी विकास योजना (DPR Based) कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प या योजना महा-डीबीटी पोर्टलद्वारे राबविल्या जात आहेत. सन २०२५-२६ अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण सर्व योजनांमध्ये ४१८५८८ लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड केलेली आहेत. त्यापैकी २९१०१५ लाभार्थ्यांना पुर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे. तरी उर्वरित सर्व प्रलंबित अर्जांसाठी पुर्वसंमती तात्काळ निर्गमित करणेबाबत क्षेत्रियस्तरावर आपलेस्तरावरून सुचना देण्यात याव्यात. तसेच सन २०२६-२७ मध्ये कृषि यांत्रिकीकरण सर्व योजनांमधुन निवडलेल्या सर्व लाभार्थ्यांना पुर्वसंमती प्रदान करणेबाबत क्षेत्रियस्तरावर आपले स्तरावरून सुचना देण्यात याव्यात.

तसेच पुर्वसंमती प्रदान केलेल्या लाभार्थ्यांना विहीत कालावधीमध्ये यंत्रे/औजारे खरेदी करून देयके अपलोड करणेसाठी आपलेस्तरावरुन सुचित करावे व सर्व अर्ज अनुदान अदायगीसाठी जिल्हास्तरावर आणुन ठेवावेत.

(मिलिंद शेंडे)
संचालक (कृषी अभियांत्रिकी संचालनालय)
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

प्रत - १. कृषि उपसंचालक, आयुक्त कृषि कक्ष, कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहीतीसाठी.
२.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सोलापुर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, बुलढाणा, वाशिम, भंडारा.

/- आपणा सुचित करण्यात येते की, आपलेस्तरावर पुर्वसंमती प्रदान करणेकरीता एकुण प्रलंबित अर्जांपैकी ट्रॅक्टर व कंम्बाईन हार्वेस्टर वगळता इतर सर्व प्रलंबित अर्जांसाठी पुर्वसंमती तात्काळ निर्गमित करणेबाबत क्षेत्रियस्तरावर आपलेस्तरावरून सुचना देण्यात याव्यात.